स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**

**समाज कल्याण आयुक्तालय, 3 चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे 1.**

दूरध्वनी क्र .20-26122752 ईमेल— sakalyanpuneest@gmail.com

**वाचा:-**
1. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-1089/प्र.क्र.15/89/बारा, दि. 16.10.1990.
2. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-1095/प्र.क्र.4/95/बारा, दि. 10.12.1995.
3. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.सकआ-2001/प्र.क्र.251/आस्था-2/दि. 27 फेब्रुवारी, 2004.
4. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभग, शासन निर्णय क्र.सकआ-200/प्र.क्र.86/आस्था-2/ दि. 12.08.2008.
5. आयुक्तालयाचे आदेश जा.क्र.सकआ/का-6/प्र-7/उच्चश्रेणी/अंतिम/से.जे./2018/3645/पुणे दि. 02.11.2018.
6. सामान्य प्रशासन विभाग शासन पत्र क्रमांक बीसीसी-2017/प्र.क्र.3212अे/16-ब, दिनांक, 29.12.2017.
7. सामान्य प्रशासन विभाग शासन निणर्य क्रमांक : बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब दिनांक 07.05.2021
8. आयुक्तालयाचे आदेश क्र. 830 दिनांक 11.03.2022
9. दिनांक:-18.05.2022 रोजी संपन्न झालेली विभागीय पदोन्नतीची समिती बैठक.

क्र.सकआ/आस्था/गट-ब/स्वीय सहा पदोन्नती/2022.23/का-9/ पुणे/ 450 दिनांक : 13 /02/2023

## -: आदेश :-

उपरोक्त शासन निर्णय क्र. 1 अन्वये मंत्रालया बाहेरील शासकीय कार्यालयांमधील विभाग प्रमुखांच्या नियंत्रणा खालील उच्चश्रेणी लघुलेखक संवर्गातील एकत्रित पद संख्या विचारात घेवून त्यापैकी उच्चश्रेणी लघुलेखक पदांच्या प्रत्येकी 4 पदापैकी एक पद याप्रमाणे पदोन्नतीच्या स्तराचे '**स्वीय सहाय्यक**' राजपत्रित गट - ब दर्जाचे वेतनश्रेणी वेतन बॅन्ड 9300-34800 ग्रेड वेतन रु.4600/- पद निर्माण करण्यात यावे असे शासन निर्देश आहेत.

त्यानुसार संदर्भ क्र. 4 अन्वये शासन स्तरावरुन सदर पदांना श्रेणीवाढ करुन 6 पदे स्वीय सहाय्यक (राजपत्रित) गट -ब दर्जाच्या पदोन्नतीच्या स्तरावरील पदांमध्ये वेतनश्रेणी वेतन बॅन्ड 9300-34800 ग्रेड वेतन रु.4600/- श्रेणीवाढ करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.त्यानुसार संदर्भ क्र. 8 अन्वये जेष्ठतम अधिकाऱ्याकडे शासन मान्यता दिल्या नुसार 6 पदांची ठिकाण निश्चिती करण्यात आलेली होती.

वरिल प्रमाणे ठिकाण निश्चित केलेल्या पदांपैकी एका पदाची निश्चिती इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाकडे करण्यात आलेली होती. ती रद्द करण्यात येत आहे. याशिवाय आयुक्त समाज कल्याण यांचे कक्षाकडील कामकाजाचा व्याप विचारात घेता सदर ठिकाणी दोन स्वीय सहाय्यकांची निकड असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. त्यामुळे व्यसनमुक्ती शाखेतील एक उच्चश्रेणी लघुलेखकाचे पद कायम स्वरुपी आयुक्त समाज कल्याण यांचे कक्षाकडे वर्ग करण्यात येऊन त्या पदास स्वीय सहाय्यक राजपत्रित गट-ब या पदाचा दर्जा देण्यात येत आहे.

समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आस्थापनेवरील मंजुर असलेल्या पदांचा आढावा वित्त विभागाच्या उच्चस्तरीय समितीने घेतला असून संदर्भ क्रमांक 7 च्या शासन निर्णयान्वये सेवाजेष्ठतेप्रमाणे रिक्त पदे भरण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्याअन्वये दिनांक 18.05.2022, रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीतील निर्देशानुसार कार्यरत उच्चश्रेणी लघुलेखक यांना **स्विय सहाय्यक (राजपत्रित) गट ब** या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे. सबब आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे पदोन्नती समितीने घेतलेल्या निर्णयानुसार उच्चश्रेणी लघुलेखक या संवर्गातून सातव्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी वेतन बॅन्ड S-16 रु. 44900-142400 या

सुधारित वेतनश्रेणीतील " **स्विय सहाय्यक (राजपत्रित) गट ब** " या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने पदस्थापनेचे आदेश निर्गमित करीत आहेत.

| **अ. क्र** | **सेवा जेष्ठता क्रमांक** | **कर्मचाऱ्याचे नांव, पदनाम व कार्यरत कार्यालयाचे ठिकाण.** | **निवड प्रवर्ग** | **पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण** |
|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. |
| 1 | 10 | श्री. एस.बी.खंडारे,उच्चश्रेणी लघुलेखक, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती मुंबई उपनगर | **खुला** | व्यसनमुक्ती शाखेतील एक उच्चश्रेणी लघुलेखकाचे पद कायम स्वरुपी आयुक्त समाज कल्याण यांचे कक्षात वर्ग करुन सदर पदास स्वीय सहाय्यक (राजपत्रित) या पदाचा दर्जा देऊन सदर पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे. |

कार्यालय प्रमुखांनी पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांना तात्काळ कार्यमुक्त करावे.

**उपरोक्त उच्चश्रेणी लघुलेखक कर्मचाऱ्यांना वरिलप्रमाणे स्विय सहाय्यक (राजपत्रित) गट ब या पदावर देण्यात आलेली पदोन्नती ही खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.**

1.मा. सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञाप्ती याचिका क्र. 28306/2017 च्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार सेवाजेष्ठते नुसार कर्मचाऱ्यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून मान्यता देण्यात आली आहे. सदरची पदोन्नती ही वरील न्यायालयीन प्रकरणाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

2.ज्या कर्मचाऱ्यांना कालबध्द / आश्वासीत प्रगती योजनेचा फायदा मंजुर करण्यात आला आहे, त्यांना कोणताही वित्तीय लाभ अनुज्ञेय असणार नाही तसेच अशा कर्मचाऱ्यांनी पदोन्नती नाकारल्यास त्यांचे फायदे आपोआपच रद्द होतील.

3.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-2015/प्र.क्र.303/का-12/दि. 12.9.2016 नुसार पदोन्नती नाकारल्यास त्याचा तिस-या वर्षी पदोन्नतीसाठी विचार केला जाईल याची नोंद घ्यावी.

**सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.**

10.2.2023

**(डॉ.प्रशांत नारनवरे)**
**आयुक्त समाज कल्याण,**
**महाराष्ट्र राज्य,पुणे.**

**प्रत :- माहितीस्तव सादर.**

1.मा. सचिव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई

**प्रत :- माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.**

1. मा. आयुक्त समाज कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य ,पुणे
2.अति. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे स्विय.
3. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती संबधित
4.वरिष्ठ कोषागार अधिकारी, सबंधीत.
5.कोषागार अधिकारी , संबंधीत.
6.संबधित कार्यालय प्रमुख
7.संबंधित कर्मचारी.

13/2/2023

10.2.2023

**आयुक्त, समाज कल्याण**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**



C:\Users\kirve\Desktop\स्वीय सहा.पदो आदेश 23.docx